Downloaded From : http://cbseportal.com/

# MARATHI (009)

## SAMPLE PAPER (2017-18)

## SECTION – A

---

**प्र. 1 ला. खालील उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.**

चार माणसे शेजारीपाजारी, पारावर, शाळेत, कचेरीत, बसमध्ये, आगगाडीच्या डब्यात या ना त्या निमित्ताने थोडा वेळ जरी एकत्र जमली की, त्यांच्या बोलण्याचा गप्पांचा आणि चर्चेचा विषय असतो, इतरांच्या चुका, इतरांचे दोष व इतरांची टवाळी! म्हणजे ही एक प्रकारची परनिंदाच चाललेली असते, असे म्हणा ना! मद्याची नशा चढावी त्याप्रमाणे परनिंदेची धुंदी माणसास चढत असते. परनिंदा करणारा माणूस स्वतःच्या अंतःकरणातील आणि सभोवतालच्या वातावरणातील प्रसन्नता नाहीशी करून सर्वत्र दुःखाचे, औदासीन्याचे, निराशेचे, मत्सराचे आणि द्वेषाचे वातावरण निर्माण करण्यास हातभार लावत असतो. धूर ओकणाऱ्या ज्योतीमुळे दिव्याची काच धुरकटून जाते आणि दिव्याचा प्रकाश पार हरपून जातो. मात्र ज्योतीची काजळी झटकली, ती मर्यादित ठेवली व दिव्यावरील काच रोज सकाळी वा संध्याकाळी स्वच्छ पुसली की प्रकाश अवतीभवती लख्ख पसरतो. अंधकाराचा लोप होऊन वातावरण उजळून निघते; तसेच आपण रात्री झोपण्यापूर्वी किंवा पहाटे उठण्यापूर्वी मनाच्या काचेवर सतत इतरांच्या अवगुणांच्या विचाराने जमलेली काजळी अंतःकरणातील क्षमेच्या राखेने स्वच्छ पुसली की, आपले मन दिवसभर टवटवीत राहते. जेथे जेथे आपण जाऊ तेथे तेथे प्रसन्नताच निर्माण करण्यास आपला हातभार लागेल.

i) ‘पहाट’ या शब्दाचा अर्थ खालील पर्यायांपैकी कोणता आहे? (1)

1- सकाळ 2. उषःकाल 3. संध्याकाळ

ii) समाजात परनिंदा कोठे कोठे झालेली दिसते? (3)

iii) मनाची काच कशी स्वच्छ करता येते? त्यापासून काय फायदा होतो? (3)

**प्र. 2 रा. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.**

बाहेरचा अपरंपार संसार मनात भरलेला असतो. तो बंद केल्याशिवाय एकाग्रता अशक्य. आपल्या आत्म्याची अपार ज्ञानशक्ती बाह्य क्षुद्र वस्तुंतच आपण खर्च करतो, परंतु असे होता कामा नये. ज्याप्रमाणे दुसऱ्याला न लुटता स्वतःच्या प्रयत्नाने श्रीमंत झालेला मनुष्य अनाठायी खर्चणार नाही, त्याप्रमाणेच आपण आपल्या आत्म्याची ज्ञानशक्ती क्षुद्र वस्तुंच्या चिंतनात खर्च करू नये. ही ज्ञानशक्ती हा आपला अमूल्य ठेवा आहे; परंतु स्थूल विषयांत ती आपण खर्च करतो. ही भाजी म्हणे चांगली नाही झाली. हिच्यात मीठ कमी झाले. किती गुंजा बाबा कमी झाले? मीठ अर्धा कण कमी पडले या महान विचारातच आमचे ज्ञान खर्च होते. लहान मुलांना शाळेच्या चार भिंतीच्या आत शिकवितात. झाडाखाली घेऊन बसतील तर कावळे, चिमण्या पाहून त्यांचे मन म्हणे एकाग्र होणार नाही. लहान मुलेच ती. कावळा, चिमणी दिसली नाही म्हणजे झाली त्यांची एकाग्रता ? परंतु आम्ही झालो घोडे, आम्हाला शिंगे

Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

फुटली. आमची एकाग्रता सात-सात भिंतींच्या आत, कोणी आम्हांस ठेवले तरी व्हावयाची नाही. कारण दुनियेतील बारीकसारीक गोष्टींची आम्ही दवडणार व त्यात कृतार्थता मानणार!

i) 'अनाठायी' या शब्दाचा अर्थ लिहा? (1)

1- आवश्यक 2. अनावश्यक 3. जास्त

ii) एकाग्रता साधण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहे? (3)

iii) लहान मुलांना शाळेच्या चार भिंतीत का कोंडतात? (2)

## SECTION - B

**प्र. 3 रा. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध किंवा मुद्द्यांच्या आधारे कथा पूर्ण करा. (8)**

i) 'वाचाल तर वाचाल'

ii) वृक्ष नष्ट झाले तर...

iii) सुदृढ शरीर हाच खरा अलंकार!

**किंवा**

**खालील मुद्दयांच्या आधारे गोष्ट लिहा व योग्य शीर्षक दया.**

**मुद्दे** : दोन मित्र - जहाजाने एकत्रित प्रवास - आनंद लुटणे - गप्पा गोष्टीत रमणे - अचानक जहाजाचे खडकावर आपटणे - दोघेही एकाच लाकडी फळीचा आधार घेतात - फळी एकाच माणसाचा भार पेलू शकते - माझ्या आईला सांभाळ अशी सूचना देऊन अविवाहित मुलाने फळी सोडली - दुसरा वाचतो.

**प्र. 4 था. खालीलपैकी एका विषयावर पत्र लिहा.**

**(5)**

**अमित** / अनिता इंगळे पंचवटी, नाशिक येथून आपल्या परिसरात होत असलेल्या बागेच्या दुरावस्थेबाबत आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना तक्रार पत्र लिहितो / लिहिते.

**किंवा**

गौरव / गौरी देशमुख क्रीडा प्रतिनिधी सरस्वती विद्यालय, पुणे, येथून शाळेच्या क्रीडा विभागासाठी काही क्रीडा साहित्या पाठवून देण्याविषयी नॅशनल स्पोर्टस, पुणे यांना मागणी पत्र लिहितो /लिहिते.

## SECTION - C

**प्र. 5 वा. अ) खालील प्रश्न सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही पाच) (5)**

i) हिमालय उंच पर्वत आहे. (विशेषनाम ओळखा)

ii) <u>पूर्वी</u> असा महापूर आला नव्हता. (अधोरेखित शब्दांची जात ओळखा)

iii) पोपट झाडावर बसला आहे. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

iv) हे उत्सव आवाज <u>किंवा</u> गर्दी या दोन्ही मुद्द्यांवर उपद्रवकारक ठरता कामा नये. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

v) तिला काम करतांना वेळेच भान राहत नाही. (सर्वनाम ओळखा)

vi) बापरे! हा यंत्रमानव बोलतोय. (केवलप्रयोगी अव्यय ओळखा)

**ब) पुढील वाक्ये कंसातील सूचनेनुसार लिहा. (कोणतेही तीन)** **(3)**

i) रामभाऊने शेत नांगरले. (प्रयोग ओळखा)

ii) हे चित्र अत्यंत सुंदर आहे. (उद्गारार्थी करा)

iii) शाळा विद्यार्थ्यांना घडविते. (भावे प्रयोग करा)

iv) पु. ल. देशपांडे यांची नाटके कोणाला आवडत नाही? (विधानार्थी करा)

**क) सूचनेनुसार सोडवा. (कोणतेही दोन)** **(2)**

i) श्रावणात सृष्टीत सर्वत्र हिरव्या रंगाची उधळण आढळते. (भविष्यकाळ करा)

ii) आम्ही सर्वजण देवळात बसलो होतो. (काळ ओळखा)

iii) प्रत्येक व्यक्तीत काही ना काही चांगले गुण असतात. (भूतकाळ करा)

**ड) लिंग बदला.** **(2)**

i) सखा

ii) सेविका

iii) देव

iv) लेखक

**इ) वचन बदला.** **(2)**

i) रस्ता

ii) फूल

iii) वहया

iv) वारा

**फ) समानार्थी शब्द लिहा.** **(2)**

i) अभिलाषा

ii) परिवर्तन

iii) अनुभूती

iv) दुर्गम

**ग) विरूद्धार्थी शब्द लिहा.** **(2)**

i) विजय

ii) कृपा

Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

iii) आनंद

iv) विषमता

## SECTION – D (Literature)

**प्र. 6 वा. अ) खालील कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **(4)**

i) कारण माझा उपयोग जे व्यवस्थित करतात ते मोठे होतात, ज्ञानी होतात, विद्वान होतात.

ii) महात्मा गांधीजी यांच्या वास्तव्याने अभिमंत्रीत झालेले ते ठिकाण होते.

iii) एकांतवासातही माणूस एकटा थोडाच असतो?

ब) योग्य पर्याय निवडून वाक्य परत लिहा. (1)

1- हा कोण लागून गेला -----------, आपल्या घरात येऊन झोपणारा?
(शहाणा/टिक्कोजीराव/बाजीराव/पाहुणा)

**प्र. 7 वा. अ) पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 5० ते 6० शब्दांत लिहा.** **(8)**

i) केशवच्या घरी गेल्यावर लेखकाच्या मनात कोणते विचार आले?

ii) मित्रमंडळीशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' का असू शकत नाही?

iii) बाबा आमटे यांची संवेदनशील वृत्ती स्पष्ट करा.

iv) 'ईद' या सणाच्या दिवशी लेखिका आशा आपराद यांच्या घरी वातावरण कसे असे?

**ब) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.** **(2)**

i) सर्वात मोठा शिक्षक कोणाला म्हटले आहे?

ii) नारायण सुर्वे कोणत्या मासिकाचे संपादक झाले?

iii) 'चित्रकलेचे खरे राजे' असे स्वामीजींनी कोणास उद्देशून म्हटले आहे?

iv) 'म्हसाळा' या खेडयात कोणासाठी वर्ग चालवले जायचे?

**प्र. 8 वा. अ) खालीलपैकी कोणत्याही एका पद्यपंक्तींचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **(4)**

i) आजि दिवाळी दसरा । सेना म्हणे आलें घरा ।।.

ii) "असा प्रलय व्हावा जमिनदोस्त व्हावीत घरे आणि शहरे"

iii) 'गावापासून दूर केले वीत भरच्या पोटाने
तरी ओळख होतसे अमुची गावाच्या नावाने'

**ब) कंसातील योग्य पर्याय निवडून ओळ पूर्ण करा.** **(1)**

गिळून (सुख / दुःख / मन) सारं, साऱ्या जगा पोसावं.

Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

**प्र. 9 वा. अ) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 5० ते 6० शब्दांत लिहा. (8)**

i) कवयित्रीने आपल्या देशातील वेगळेपण कसे वर्णिले आहे?
ii) कवीच्या मते, परमेश्वराचे दर्शन कोठे – कोठे घडते?
iii) 'ढगाच्या छायेप्रमाणे संसार असतो' असे संत सोयराबाईना का वाटते?
iv) माझ्या घरट्यात कोणकोणत्या गोष्टी नाहीत असे कवी म्हणतो?

**ब) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. (2)**

i) संत नरहरी सोनार यांनी दीनानाथ कोणाला म्हटले आहे?
ii) कवीच्या मते दुःख गिळून स्त्री काय करते?
iii) विभिन्नतेतही देश कशाचे गीत गातो?

**प्र. 10 वा. ¼v½ खालील पठित उताऱ्यातील ओळी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहाः (4)**

हिंसा, अभिलाषा, मत्सर हे जीवनाचाच भाग आहेत. हे सध्या तुमच्या शाळकरी आयुष्यातच तुम्हाला दुर्दैवाने शिकायला मिळते. मोठे व्हाल तेव्हा तुम्हाला याच शत्रूंना जिंकायचे आहे. तेव्हा प्रत्येक दिवसाची सुरुवात प्रार्थनेने करा.

आपण सारेजण काम करू या. खेळ खेळू या. आणि तेही एकत्र ! सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या मनात कधीही कुणाविरूद्ध व्देष असता कामा नये.

अंथरूणातून जमिनीवर पाऊल टाकताना, आपण सर्वांचे भरणपोषण करणाऱ्या धरणी मातेचे न चुकता स्मरण करायला तुम्ही शिका.

तुम्ही जेव्हा स्नान करता तेव्हा आपणासाठी पर्वतांमधून, खोलखोल दऱ्याखोऱ्यांतून व महान नदयांतून येणाऱ्या आशीर्वादस्वरूप पाण्याचे स्मरण ठेवा.

**प्र.** जीवनात यशस्वी होण्यासाठी कोणत्या गोष्टी कराल तुमच्या शब्दात लिहा.

**किंवा**

**प्र.** आपण धरतीमातेचे व पाण्याचे उपकार का मानावेत स्पष्ट करा.

**ब) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. (कोणतेही दोन) (2)**

i) लेखक नागनाथअण्णा नायकवडी यांच्या मनावर प्रारंभापासूनच ------------- यांच्या क्रांतिकारी विचारांचा ठसा होता. (लोकमान्य टिळक/सुभाषचंद्र बोस/महात्मा गांधी)
ii) जगात जन्मलेले पहिले पुस्तक ------------ या देशात जन्मले. (इंग्लंड/जपान/भारत)
iii) लेखक आनंद यादव यांचे गाव ------------ होते. (कागल/सांगत/पंढरपूर)
iv) चिनार आणि ------------ शहाणी मुलं होती. (जाई/जुई/सई)

Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE